महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/माप/2443
दि. ०९/११/२०२६

प्रति,

मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग अमरावती

विषय :- फेब्रुवारी/मार्च २०२७ मध्ये आयोजीत करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतीम वेळापत्रके जाहीर करणेबाबत

संदर्भ :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-६/४८३६, दि.०६/११/२०२६ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, फेब्रुवारी/मार्च २०२७ मध्ये आयोजीत करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतीम वेळापत्रके जाहीर करणेबाबतचे प्रकटन पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

सहपत्र :- प्रकटनाची प्रत

आपली विश्वास्

09-11-2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहा सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे
२) मा.विभागीय उपसंचालक,अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीस्तव.
३) शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.
४) प्राचार्य/मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त शाळा,व कनिष्ठ महाविदयालय,अमरावती विभाग अमरावती यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई
बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क.रा.मं./परीक्षा–६/४८३६
पुणे–४११ ००४.
दिनांक–०६/११/२०२६

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–४०००३२.
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई–४०००३०.
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई–२०
५) मा. संचालक,आकाशवाणी केंद्र पुणे/नागपूर/ छ.संभाजीनगर /मुंबई/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक/ रत्नागिरी
६) मा. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्रे

विषय– फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत

महोदय,

फेब्रु–मार्च २०२७ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी–

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/छ. संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/छ. संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.

माहितीस्तव सविनय सादर–

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई–३२.
मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्तालय, पुणे–०१.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

विषय– फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत

* प्र क ट न *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

अ. क्र.	तपशील	उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा कालावधी	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी
१)	लेखी परीक्षा	सोमवार, दि. ०८ फेब्रुवारी, २०२७ ते गुरुवार, दि. १८ मार्च २०२७	सोमवार, दि. १५ फेब्रुवारी,२०२७ ते सोमवार, दि. १५ मार्च, २०२७
२)	प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन	बुधवार, दि. २० जानेवारी २०२७ ते शनिवार, दि. ०६ फेब्रुवारी २०२७	गुरुवार, दि. २८ जानेवारी २०२७ ते शनिवार, दि. १३ फेब्रुवारी २०२७

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि.०६/११/२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक हे अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/११/२०२६

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.